विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अ‍ॅण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# विद्यार्थ्यांचे परदेशी शिक्षणाचे स्वप्न आता भारतातच पूर्ण होणार - मुख्यमंत्री

## पाच आंतरराष्ट्रीय विद्यापीठांना आशयपत्र प्रदान

**मुंबई -** भारतीय विद्यार्थ्यांना परदेशातील विद्यापीठांमध्ये उच्च शिक्षणासाठी जाण्याची गरज राहणार नाही कारण आज राज्य शासनाने राष्ट्रीय शिक्षण धोरणातंर्गत पाच परदेशी विद्यापीठांसोबत आशयपत्र प्रदान केले आहे.आंतरराष्ट्रीय विद्यापीठांचे भारतातील पहिले शैक्षणिक हब मुंबई, नवी मुंबईत उभारण्यात येत असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

हॉटेल ताज येथे 'मुंबई रायझिंग : क्रिएटिंग अ‍ॅन इंटरनॅशनल एज्युकेशन सिटी' या पाच जागतिक विद्यापीठांना (एलओआय) आशयपत्र प्रदान करण्याचा कार्यक्रम पार पडला कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते.यावेळी केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान, उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील,केंद्रीय शिक्षण सचिव तथा विद्यापीठ अनुदान आयोगाचे अध्यक्ष विनित जोशी,अपर मुख्य सचिव असिमकुमार गुप्ता, सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल, ब्रिटनच्या उच्चायुक्त लिंडी कॅमेरॉन, ऑस्ट्रेलियाचे कॉन्सुल जनरल पॉल मर्फी,अमेरिकेचे कॉन्सुल जनरल माईक हँकी, इटलीचे कॉन्सुल जनरल वॉल्टर फेरारा, अ‍ॅबर्डीन विद्यापीठाचे उपप्राचार्य ग्लोबल एंगेजमेंट प्रा.सिलादित्य भट्टाचार्य, यॉर्क विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. चार्ली जेफ्री, वेस्टर्न ऑस्ट्रेलिया विद्यापीठ उपकुलगुरू गॉय लिटलफेअर, इलिनॉय इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीचे अध्यक्ष इलिनॉय टेक राज ईचंबाडी, आयईडी चे रिकार्डो बाल्बो,अधिष्ठाता,विविध विद्यापीठांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की,युनिव्हर्सिटी ऑफ अ‍ॅबर्डीन (स्कॉटलंड, यु.के.), युनिव्हर्सिटी ऑफ यॉर्क (यु. के.),युनिव्हर्सिटी ऑफ वेस्टर्न ऑस्ट्रेलिया (ऑस्ट्रेलिया),इलीनॉय इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (अमेरिका),इस्तितुतो यूरोपीओ दी डिझाईन (इटली) ही जगातील पाच नामवंत विद्यापीठे भारतात येत आहेत. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरात ही विद्यापीठे उभी राहणार आहेत.याचं परिसरात येत्या काही वर्षात मेडिसिटी,स्पोर्टस सिटी आणि इनोव्हेशन सिटी उभारणारण्यात येणार आहे. येथे आगामी कालावधीत दहा विद्यापीठ एकत्र येतील अशी संकल्पना राबवण्याचा विचार आहे. सध्या या पाच विद्यापीठांमुळे हा परिसर पूर्ण शिक्षण आणि संशोधन साठी ओळखला जाईल.मुंबईची सध्या वित्तीय,औद्योगिक आणि मनोरंजन उद्योगाचे शहर म्हणून ओळख आहे. विद्यापीठामुळे एज्युकेशनल सिटी अशी ओळख होईल.विकसित भारत २०४७ मध्ये हा निर्णय महत्वाची भूमिका बजावेल.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, अ‍ॅबरडीन विद्यापीठ, यॉर्क विद्यापीठ, वेस्टर्न ऑस्ट्रेलिया विद्यापीठ, इलिनॉय इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी आणि इस्टिट्यूटो युरोपियो डी डिझाईन हे मुंबई,नवी मुंबईत पूर्ण कॅम्पस आणणार आहेत - राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० शी सुसंगत अशा प्रकारचा हा पहिलाच उपक्रम नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ विकसित होत आहे. अटल सेतू निर्माण झाला आहे.. पायाभूत सुविधांच्या व्यवस्था आणि आंतरराष्ट्रीय कनेक्टिव्हिटी यामुळे विद्यापीठाशी निगडित सर्वांना उपयुक्त ठरेल. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळे परदेशातील अनेक विद्यापीठांना भारतात येण्यासाठी उत्सुकता दाखवली आहे.ज्या भारतीय तरुणांना परदेशी जाऊन शिक्षण घेणं शक्य नाही त्यांचे स्वप्न आता अपुरे राहणार नाही. सध्या पाच विद्यापीठे आली आहेत. पण भविष्यात अजूनही विद्यापीठांचे स्वागत करायला आम्ही तयार आहोत.नुकताच वेर्स्टन युनर्व्हसिटी आणि गोंडवाना विद्यापीठ यांच्यात सामंजस्य करार झाला असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

**विकसित भारत करण्यासाठी नवीन शैक्षणिक धोरण हातभार लागेलः केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान**

केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान म्हणाले की,मुंबई ही स्वप्नांची नगरी आहे त्याचबरोबर ही आर्थिक राजधानी देखील असून आगामी कालावधीत मुंबई येथे शिक्षणाचे हब होण्यासाठी परदेशी पाच विद्यापीठांचा खूप महत्त्वाचं योगदान राहील. भारत हा प्राचीन काळापासून शिक्षण क्षेत्रात जागतिकस्तरावर नावलौकिक राहीला आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वामध्ये विकसित भारतची स्वप्न साकारण्यासाठी अनेक योजना राबविल्या जात आहेत. नवीन शैक्षणिक धोरणामुळे जागतिक पातळीवरच्या विद्यापीठांना देखील आपल्या संस्था भारतात सुरू करता येणार आहेत त्याचबरोबर भारतातील शिक्षण संस्थांना परदेशामध्ये आपल्या शाखा उघडता येणे शक्य होणार आहे.भारतात जागतिक दर्जाचे शिक्षण विद्यार्थ्यांना कमी खर्चात उपलब्ध होईल. आज भारतातील आयआयटी, आयआयएम, आयएफ, सिम्बॉयसिस यासारख्या संस्था परदेशामध्ये सुरू झाल्या आहेत.परदेशी विद्यापीठ भारतात येवून शिक्षण देणार भारताला विकसित बनवण्यासाठी आणि शिक्षण क्षेत्रात पुढे नेण्यासाठी हा निर्णय खूप महत्त्वाचा आहे असेही केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान म्हणाले.

यावेळी गुजरात अहमदाबाद विमान दूर्घटनेत मृत्यूमुखी पडलेल्या प्रवाश्यांना यावेळी श्रध्दांजली वाहण्यात आली.मुख्यमंत्री यांचे विशेष कार्यकारी अधिकारी कौस्तुभ ढवसे यांनी सुत्रसंचालन केले.प्रास्ताविक सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांनी केले.यावेळी केंद्रीय शिक्षण सचिव विनित जोशी यांनी मनोगत व्यक्त केले.



**जागतिक दर्जाची पाच विद्यापीठे नवी मुंबईत**

युनिव्हर्सिटी ऑफ अ‍ॅबरडीन, यूकेमधील सर्वात जुन्या विद्यापीठांपैकी एक आणि भारतात कॅम्पस स्थापन करणारे पहिले स्कॉटिश विद्यापीठ असून २०० हून अधिक भारतीय विद्यापीठे आणि संशोधन केंद्रांसह अनेक दशकांच्या विद्यापीठ भागीदारी यामध्ये असून आयआयटी - इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी; एम्स - ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस; मणिपाल अकादमी; आयसीएआर - इंडियन कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्च, आयसीएमआर - इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च आणि दिल्ली विद्यापीठ यांचा समावेश आहे.

जगातील टॉप १०० विद्यापीठांमध्ये स्थान मिळवलेले आणि आयव्ही लीग सम तुल्य संस्था आणि मुंबईत कॅम्पस स्थापन करणारे ऑस्ट्रेलियातील प्रतिष्ठित ग्रुप ऑफ एट (ऱ्8) विद्यापीठांमध्ये पहिल्या क्रमांकावर असलेले वेस्टर्न ऑस्ट्रेलिया विद्यापीठ. भारतीय विद्यार्थ्यांच्या आकांक्षा आणि भविष्यात जागतिक कार्यबल आणि अर्थव्यवस्थेच्या विकसित होत असलेल्या गरजा पूर्ण करण्यासाठी तयार केलेले विज्ञान,औद्योगिक व इंजिनिअरींग या क्षेत्रात (डढएच्)व्यवसाय या विषयांमध्ये पदवीपूर्व आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम असतील.

यॉर्क विद्यापीठ ही यूकेमधील सर्वात प्रतिष्ठित संशोधन-केंद्रित संस्थांपैकी एक आहे तसेच ते रसेल ग्रुपची सदस्य आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि सायबर सुरक्षा, व्यवसाय, अर्थशास्त्र आणि सर्जनशील उद्योगांसह संगणक विज्ञानातील अत्याधुनिक पदवीपूर्व पान २ वर

---

युवा आदर्श

### विस्कट ...

लाडकी बहीण बोले
पैसे जमले खटाखट
ईव्हीएम वरती संतुष्ट
बटने दाबले फटाफट
राजकारणी कसलेले
ते सर्वांग कुशल नट
हीट करतात सिनेमा
ताळ्यावर आणे चट्
स्पष्ट जाणवू लागले
उघड मनातले कपट
बॉक्स ऑफिस फुल्
हिट्ट झाला चित्रपट
आधी शांत मुकपट
नंतर झाला बोलपट
मिर्ची पेरु खा भरपूर
पटापट बोले पोपट
विरोधक आग लावे
फटाके उडे सटासट
फैलू लागते अफवा
जाणून केलेला कट
उपकृत केले सकला
कर वसूल दामदुप्पट
नावकाढ स्वखुशीने
नको उगाचं कटकट
गैरफायदा घेणारे ते
हाता घुसवी धस्कट
भल्या योजनेचा का
करती असा विस्कट

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

---

## जिल्हा वार्षिक योजना सन २०२५-२०२६ करीता ५१४.९६ कोटींचा निधी मंजूर

# प्राप्त निधी वेळेत खर्च करावा - पालकमंत्री मुंडे

**जालना । प्रतिनिधी -** जिल्हा वार्षिक योजना सन २०२५-२०२६ अंतर्गत सर्वसाधारण योजना ४३६ कोटी, अनुसुचित जाती उपयोजना ७६ कोटी, आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजना २.९६ कोटी असे एकूण ५१४.९६ कोटींचा निधी मंजूर झाला आहे. तरी सर्व शासकीय यंत्रणांनी प्राप्त निधी वेळेत खर्च करण्याच्या निर्देश राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री श्रीमती पंकजा प्रज्ञा गोपीनाथ मुंडे यांनी दिले.

**मंजूर तरतूदी :**

कृषी व संलग्नसेवा - रु. २२.९६ कोटी
ग्रामीण क्षेत्राच्या विकासाच्या योजना - रु. २०.५० कोटी
जलसंधारण विभागाच्या योजना - रु. २४.१० कोटी
ऊर्जा विकास (MSEB व अपारंपारीक ऊर्जा ) - रु. ३0.00 कोटी
शिक्षण विभागाच्या योजना - रु. २४.१७ कोटी
महिला व बाल विकासाच्या योजना - रु. २१.४0 कोटी
आरोग्य सेवांचे बळकटीकरण - रु. ४८.९८ कोटी
नगर विकास विभाग- रु. ७0.२६ कोटी
रस्ते व परिवहन - रु. ४५.५0 कोटी
पर्यटन, तिर्थक्षेत्र, संरक्षित स्मारके यांचे संवर्धन व विकास - रु. २५.५१ कोटी
पोलिस व तुरुंग व्यवस्थेचे बळकटीकरण - रु. १२.४0 कोटी
दिव्यांगांकरीता १ % राखीव - रु. ४.१३ कोटी




येथील नियोजन भवनात आयोजित जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत श्रीमती पंकजा मुंडे या बोलत होत्या. यावेळी बैठकीस खासदार कल्याण काळे, आमदार राजेश राठोड, आमदार बबनराव लोणीकर, आमदार संतोष दानवे, आमदार नारायण कुचे, आमदार हिकमत उढाण, आमदार विक्रम काळे, जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, प्रभारी जिल्हा पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल, जिपचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी शिरिष बनसोडे, अप्पर जिल्हाधिकारी श्रीमती रिता मैत्रवार, निवासी उपजिल्हाधिकारी गणेश महाडिक, जिल्हा नियोजन अधिकारी सुनिल सुर्यवंशी यांच्या सह सर्व समिती सदस्य उपस्थित होते.

पालकमंत्री पालकमंत्री श्रीमती पंकजा मुंडे पुढे म्हणाल्या की, जिल्ह्याला जिल्हा वार्षिक योजना सन २०२५-२०२६ अंतर्गत एकुण ५१४.९६ कोटी निधी मंजूर झाला आहे. याकरीता सर्व यंत्रणांनी योग्य पान २ वर

---

# चर्चेत भाग घेतला नाही!

## इस्त्रायलचा निषेध करणाऱ्या एससीओच्या निवेदनावर भारताची भूमिका

**नवी दिल्ली -** इस्त्रायल आणि इराण या दोन देशात संघर्ष सुरू आहे. यादरम्यान शांघाई कॉर्पोरेशन ऑर्गनायजेशन (SCO) ने शनिवारी इस्त्रायलने इराणमध्ये केलेल्या हल्ल्याचा निषेध करत एक वक्तव्य जारी केले होते. याच्या काही तासांतच भारताने 'चर्चेत सहभागी झालो नाही' असे स्पष्ट करत यातून अंग काढून घेतले आहे. तसेच यासंबंधी भारताची भूमिका पूर्वी होती तीच असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.

चीनच्या नेतृत्वाखालील १० सदस्य गटाने त्यांच्या निवेदनात मध्य पूर्वेत वाढलेल्या तणावाबद्दल गंभीर चिंता व्यक्त केली होती. याबरोबर इस्त्रायलने इराणमध्ये नागरी लक्ष्यांवर केलेल्या लष्करी कारवाईचा निषेध देखील करण्यात आला होता.

त्या (कृती) इराणच्या सार्वभोमत्त्वाचे उल्लंघन करतात, तसेच प्रादेशिक आणि आंतरराष्ट्रीय सुरक्षेला हानी पोहचवतात आणि जागतिक शांतता आणि स्थैर्याला देखील गंभीर धोका निर्माण करतात, असे त्या निवेदनात म्हटले होते. तसेच यामध्ये सदस्य राज्य इराणच्या अणुकार्यक्रमाच्या भोवतीची परिस्थिती ही पूर्णतः शांतता आणि राजकीय आणि राजनैतिक मार्गाने हाताळली जावी यासाठी आग्रही आहेत, असेही स्पष्ट करण्यात आले होते. नागरी लक्ष्यांवर (इराणमधील), ऊर्जा आणि वाहतूकीच्या पायाभूत सुविधांवर करण्यात आलेली आक्रमक कारवाई, ज्यामध्ये काही नागरिकांचा मृत्यू झाला आहे हे आंतरराष्ट्रीय कायद्याचे आणि संयुक्त राष्ट्रांच्या चार्टरचे उल्लंघन आहे, असेही या निवेदनात म्हटले आहे.

दरम्यान हे निवेदन जारी करण्यात आल्यानंतर भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने भूमिका स्पष्ट केली आहे. भारताची स्वतःची या प्रकरणातील भूमिका आम्ही १३ जून २०२५ आणि ती अजूनही कायम आहे. आमची विनंती आहे की तणाव कमी करण्यासाठी संवाद आणि रानैतिक मार्गांचा वापर करावा आणि आंतरराष्ट्रीय समुदायाने त्या दिशेने काम करणे आवश्यक आहे. परराष्ट्र मंत्रालयाने भारताचे परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांनी इराणचे परराष्ट्रमंत्री सयद अब्बास अराघाची यांना शुक्रवारी फोन केल्याचे नमूद केले आहे. तसेच जयशंकर यांनी सध्याच्या घडामोडींबद्दल आंतरराष्ट्रीय समुदायाला असलेली चिंता त्यांच्याकडे व्यक्त केली. याबरोबरच संघर्ष वाढवणे टाळण्याबाबत आणि परिस्थितीतून राजनैतिक चर्चांमधून मार्ग काढण्याची विनंती केली.

---

# जालन्यात २८ जून रोजी 'वक्फ बचाव' परिषद

## वक्फ कायद्यातील सुधारणांवर विद्वानांकडून भाष्य!

**जालना । प्रतिनिधी -** अलीकडेच लागू झालेल्या वक्फ (सुधारणा) कायद्याविरोधात जनजागृती करणे आणि जनमत तयार करण्याच्या उद्देशाने, ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डच्या तहफ्फुज-ए-अवकाफ समितीच्या (वक्फ बचाव समिती) वतीने 'वक्फ बचाव' ही महत्त्वपूर्ण परिषद शनिवार, २८ जून रोजी संध्याकाळी ६ वाजता ते रात्री १० वाजेपर्यंत जालना येथे आयोजित करण्यात आली आहे.

आयोजकांनी दिलेल्या प्रसिद्धीपत्रकानुसार, या परिषदेचे उद्दिष्ट सुधारित वक्फ कायद्याचे संभाव्य परिणाम स्पष्ट करणे तसेच देशभरातील वक्फ मालमत्तेच्या संरक्षणासाठी सामूहिक कृतीची रणनीती आखणे हे आहे.

या परिषदेला मुस्लिम पर्सनल लॉ बोर्ड तसेच विविध प्रमुख इस्लामिक संघटनांचे नेते उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. या प्रमुख वक्त्यांमध्ये मौलाना फजलूर रहीम मुजद्दी (सरचिटणीस, मुस्लिम पर्सनल लॉ बोर्ड), मौलाना उमरैन महफूज रहमानी (सचिव, बोर्ड), मौलाना सय्यद सदतुल्ला हुसैनी, डॉ. सय्यद कासिम रसूल, मौलाना असगर अली मेहदी, मौलाना हाफिज मोहम्मद नदीम सिद्दीकी (अध्यक्ष, जमियत उलेमा महमूद मदनी - महाराष्ट्र), मौलाना हलीमुल्ला कासमी आणि महमूद दर्याबादी यांचा समावेश आहे.

या परिषदेस यशस्वी करण्यासाठी मुफ्ती अब्दुल रहमान, मौलाना अब्दुल रौफ नदवी (संयोजक, तहफ्फुज-ए-अवकाफ कमिटी), मौलाना सय्यद नसरुल्लाह हुसैनी सुहेल नदवी, ज्येष्ठ नेते इक्बाल पाशा, मुफ्ती फहीम, शेख मुजीब (सचिव, जमाअते इस्लामी हिंद - महाराष्ट्र), लियाकत अली, फेरोज अली, इलियास नादवी, असदुल्ला रझवी, सय्यद इरफान, अतिक खान, मोहम्मद कासिम, अब्दुल वाहिद, अहमद नूर आदी कार्यकर्ते परिश्रम घेत आहेत.

# संपादकीय

## प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

मुंबई उपनगरी रेल्वे वाहतूक अर्थात मुंबईची लोकलसेवा ही मुंबईची जीवनवाहिनी समजली जाते. दररोज पाऊण कोटीहून अधिक मुंबईकर लोकल सेवेने प्रवास करतात. मात्र आज हीच मुंबईकरांची जीवनवाहिनी मुंबईकरांसाठी मृत्युवाहिनी ठरत आहे. याचा प्रत्यय पुन्हा एकदा आला. नुकतीच मुंब्रा स्थानकाजवळ लोकलमधून पडून झालेल्या दुर्घटनेत चार जणांचा मृत्यू झाला. या दुर्घटनेनंतर मुंबईतील लोकल वाहतूक करणाऱ्या प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला. अर्थात लोकल दुर्घटनेत मुंबईकरांचा जीव जाण्याची ही पहिली वेळ नाही. या आधीही अनेकांनी अशा दुर्घटनेत आपला जीव गमवला आहे. रेल्वे अपघातात दररोज पाच ते सात जणांचा मृत्यू होतो असा एक अहवाल सांगतो याचाच अर्थ रेल्वेचा प्रवास आता पूर्वी इतका सुरक्षित राहिला नाही. या दुर्घटनेनंतर नेहमीप्रमाणे राजकीय पक्षांनी एकमेकांवर आरोप प्रत्यारोप करून आपली राजकीय पोळी भाजून घेतली. रेल्वे मंत्रालयाने या दुर्घटनेनंतर सर्व लोकलना स्वंयचलीत दरवाजे बसवण्याचे घोषित केले तर मुख्यमंत्र्यांनी सर्व लोकल वातानुकूलित करून लोकल गाड्यांना स्वयंचलित दरवाजे बसवण्याची घोषणा केली. लोकल गाड्यांना स्वयंचलित दरवाजे बसवण्यास अनेकांनी विरोध केला. लोकलमधील वाढत्या गर्दीच्या पार्श्वभूमीवर स्वयंचलित दरवाजे हा उपाय योग्य ठरणार नाही. स्वयंचलित दरवाज्यामुळे घुसमट होऊन लोकलमधील प्रवाशांचा जीव गुदमरणार नाही का ? असा प्रश्न उपस्थित केला जातो आणि तो योग्यही आहे. सर्वच लोकल वातानुकूलित करण्यास ही विरोध होतोय कारण लोकल वातानुकूलित केल्यावर तिकिटांचा दर वाढेल पर्यायाने सर्वसामान्य प्रवाशांच्या प्रवासावरच गदा येऊ शकते. मुंब्रा दुर्घटनेनंतर अशी दुर्घटना घडू नये यासाठी अनेक उपाययोजना सुचविल्या जात आहेत त्याचे स्वागतच व्हायला हवे मात्र मूळ प्रश्न हा मुंबईतील वाढत्या लोकसंख्येचा आहे. वाढत्या लोकसंख्येपुढे सर्वच साधनसामुग्री अपुरी पडत आहे. मुंबईत परप्रांतीयांचे लोंढेच्या लोंढे येत आहेत केवळ परप्रांतीयच नाही तर खेड्यातूनही हजारो लोक मुंबईत रोजगारासाठी स्थलांतर करत असतात त्यामुळे मुंबईची सूज वाढत चालली आहे. कितीही आणि कोणत्याही उपाययोजना केल्या तरी त्या वाढत्या लोकसंख्येपुढे अपुऱ्याच ठरणार आहे. त्यामुळेच शहरांचा नव्याने पुनर्विकास करण्याची गरज आहे मी माझ्या ' शहरांच्या नियोजनाचा पुनर्विचार व्हावा! ' या लेखातच हे लिहिले आहे. जोवर शहरांच्या नियोजनाचा पुनर्विचार होणार नाही तोवर अशा घटना घडतच राहणार आणि त्यात मुंबईकरांचा जीव जातच राहणार आहे.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

शनिशिंगणापूर मंदिरातील ११४ मुसलमान कर्मचाऱ्यांना हटवण्याचा निर्णय स्वागतार्ह;

# अन्य मंदिरांमधूनही मुसलमान कर्मचाऱ्यांना हटवा! - हिंदु जनजागृती समिती

**छत्रपती संभाजीनगर -** श्री शनिशिंगणापूर मंदिरात मुसलमान कर्मचाऱ्यांकडून पवित्र चौथऱ्यावर ग्रील बसवण्याच्या प्रकारामुळे हिंदू समाजात तीव्र संताप होता. यानंतर मंदिर प्रशासनाने ११४ मुसलमान कर्मचाऱ्यांना कामावरून हटवले, ही योग्य आणि वेळेवर उचललेली कृती आहे. हिंदु जनजागृती समिती, महाराष्ट्र मंदिर महासंघ आणि इतर हिंदुत्वनिष्ठ संघटनांतर्फे या निर्णयाचे अभिनंदन करण्यात येत आहे.

या घटनेच्या पार्श्वभूमीवर शासनाच्या नियंत्रणात असलेल्या अन्य देवस्थानांमध्येही अशा अन्य धर्मीय कर्मचाऱ्यांची चौकशी करून त्यांना तात्काळ सेवामुक्त करण्यात यावे, अशी मागणी हिंदु जनजागृती समितीने केली आहे.

मंदिर हे श्रद्धेचे केंद्र असून तेथे कर्मचाऱ्यांची श्रद्धा व आचार धर्मसंगत असणे आवश्यक आहे. मंदिर व्यवस्थापनाने सात्त्विकतेचा विचार करूनच कर्मचाऱ्यांची नियुक्ती करावी, असे मत हिंदु जनजागृती समितीचे राज्य संघटक श्री. सुनील घनवट यांनी व्यक्त केले आहे.



# जीवनात प्रत्येक वादळात खंबीरपणे उभे राहणारे फक्त माय-बापच!

वडिलांचा मानसन्मान व्हावा या उद्देशाने जगात दरवर्षी जून महिन्याच्या तिसऱ्या रविवारला पितृदिन (फादर्स डे) साजरा केला जातो.त्या अनुषंगाने यावर्षी पितृदिन (फादर्स डे) १५जून २०२५ रोज रविवारला येत आहे. त्यामुळे पितृत्व आणि मातृत्व या परीभाषांशी किती जवळच आणि रक्ताच नात असते हे आपल्याला आई-वडील या शब्दावरूनच सहज समजून येते. या जगात माय-बापा शिवाय मोठा कोणीही नाही. आई-वडील, माय-बाप या शब्दाला सुध्दा कुठेही तोड नाही.कारण आई- वडील हा शब्द फक्त मानवजाती पुरताच सीमित नसून संपूर्ण जीवसृष्टी, पशुपक्षी या शब्दाशी घनिष्ठ व निगडित आहे. तेव्हाच आपल्याला उत्पत्ती,संस्कार,संस्कृती,जडण-घडण सर्वत्र दिसून येते. ज्याप्रमाणे आई-वडील मुलांची जोपासना करते. त्याचप्रमाणे पशुपक्षी व संपूर्ण जीवसृष्टी आपल्या पिल्लांची (मुलांची) जोपासना करून लहाण्याचे मोठे करतात. ही ईश्वरी देणच आहे.त्यामुळे या जगात आई-वडीला पेक्षा कोणीही मोठा नाही.कारण वडीलांवर आपल्या मुलांचीच नाही तर संपूर्ण कुटुंबाची मोठी जबाबदारी असते.त्यामुळे आर्थिकदृष्ट्या व इतर बाबतीत सुरक्षेची ढाल बनून वडील आपले कार्य तत्परतेने करीत असतो.त्यामुळे आई-वडीलांची भुमिका समान असते.आई नेहमी मायेच पांघरूण घालत असते तर वडील पहाडासारखा संपूर्ण कुटुंबाची रक्षा करून सुरक्षा कवचची भुमिका निभवत असतो.सर्वांनीच आई- वडीलांची सेवा व सन्मान करायला हवा.वडीलांचा मानसन्मान करून पितृ दिवस हा तर दररोज साजरा करायला पाहिजेच. परंतु जगाला जान रहावी म्हणून ठराविक दिवशी पितृ दिनाला महत्व आहे.पितृ दिन असो किंवा मातृ दिन दोन्ही दिवस एकसमानच असतात. कारण मातृदिनाचा इतिहास १८६० या दशकाशी संबंधित आहे. त्यामुळे सर्वप्रथम मातृदिनाची सुरूवात अमेरिकेतुन झाली. यानंतर पितृदिनाची मागणी व्हायला लागली.१९०७ मध्ये प्रथमच पितृदिन अनधिकृतपणे साजरा करण्यात आला. यानंतर अधिकृतपणे १९१० ला पितृदिनाला सुरूवात झाली. मात्र पितृदिन साजरा करण्याच्या तारखांमध्ये मतभेद आहेत. मातृत्व दिन(मदर्स डे) प्रमाणेच वडिलांचा आदर सन्मान व्हावा व कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी पितृदिन (फादर्स डे) साजरा केला जातो.जगात आई-वडील या शब्दाला कुठेही तोड नाही.कारण जगातील कोणतीही भाषा असो मामा-मामी, काका -काकु,माऊशी-मावसा, आत्या-मामा,ताई-दादा,आजी-आजोबा इत्यादी अनेक नाते आहेत व यासाठी वेळोवेळे शब्दप्रयोग सुध्दा आहेत. परंतु जगातील कोणत्याही कानाकोपऱ्यात जा तुम्हाला आई-वडील यांच्यासाठी एकच शब्द दिसेल.उदाहरण द्यायचे झाले तर आई-बाबा, मम्मी -पप्पा अशाप्रकारे जगात एकच शब्द आपल्याला आई-वडीलांसाठी दिसून येईल ही एक सृष्टीची लिलाच म्हणावी लागेल.मानवी नातेसंबंध आणि जगातील वेगवेगळ्या नात्यातील एक नातं म्हणजे वडिलांच नात असते.वडीलांच आणि मुलांचे नाते म्हणजे समुद्रातील पाण्यासारख अफाट असते.कारण प्रत्येक आई मुलांना घडवीते सुसंस्कृत करते व पदोपदी मुलांची काळजी घेते यातच मातृत्व दडलेले दिसून येते.कारण आई मुलांच्या सानिध्यात चोवीस तास असते.त्यामुळे आपले मुल काय करीत आहे आणि आपण त्यांच्यासाठी काय केले पाहिजे याची सटीक चाहूल फक्त आईलाच कळते व त्यापध्दतीने मुलांचे संगोपन करीत असते.आई अशी दैवी शक्ती आहे की मुला-मुलीनसाठी आकाश-पाताळ एक करते. परंतु मुलाला कधीच उपाशी ठेवत नाही.आई घरातील सर्वांचे जेवण झाल्यावरच जेवण करीत असते. आई-वडीलांच नातं या भुतलावर अफाट असुन न भूतो न भविष्यती अशाप्रकारचे हे नाते आहे. कारण वडिल भुक- तहान विसरून आपल्या कुटुंबाकरीता राबत असतो व घरग्रहस्ती चालवीतो. म्हणजेच घराला आर्थिक बळ देण्याचे काम वडिल करीत असतात तर वडिलांनी केलेल्या कमाईच्या आधारे घर चालवण्याची मोठी जबाबदारी आईची असते. कारण मोजक्या पैशात आईला घर चालवायचे असते.म्हणजे घरात काय कमी जास्त आहे हे सर्व आईलाच पहावे लागते व ही तीची मोठी कसोटीची परिक्षा असते. समाजात आईच्या कार्याला तोड नाही व वडिलांच्या कर्तुत्वाला कोणीही मात करू शकत नाही.म्हणुन सर्वांनीच लक्षात ठेवले पाहिजे की आपले खरे गुरु व दैवत आई-वडीलच त्यामुळे आजच्या तरुण पिढीने आई-वडीलांना प्रथम स्थानावर ठेवले पाहिजे.आई या शब्दाला किती महत्त्व आहे हे आपण या ओवी वरून समजू शकतो. आई माझा गुरु,आई कल्पतरू सुखाचा सागर आई माझी, प्रीतीचे माहेर, शांतीचे आगर मांगल्याचे सारं आई माझी. म्हणजे आईविना जग नाही व वडीलांविना आधार नाही. आपल्याला थोडीशी जरी इजा किंवा दुर्घटना झाली तर मुलं आईग म्हणून किंचाळतो तेव्हा आईच्या रूपात कोणीना-कोणी अवश्य धावुन येतोच ही दैवी शक्ती आई या शब्दात आपल्याला दिसुन येते.या उलटं वडिलांचे आहे.एखादी मोठी दुर्घटना घडली तर प्रत्येक व्यक्ती बापरे म्हणून जोरांनी ओरडतो अशा वेळी ताबडतोब आजुबाजुला असलेले नागरिक वडिलांची भूमिका बजावतात. म्हणजेच वडील तीथेच नसतांना सुध्दा तेथील संपूर्ण नागरिक वडिलांची भूमिका बजावतात. अशा वेळी आपणही म्हणतो की लोक देवासारखे धावुन आले. म्हणजे आईग आणि बापरे या कठीण शब्दांसामोर सर्वसामान्य माणूस आपल्या आई-वडिलांची भुमिका बजावतात व दैवी रूपाने मदतीला धावून येतात. मानवजातीमध्येच ज्याप्रमाणे आईची भूमिका असते त्याचप्रमाणे संपूर्ण पशुपक्षी व जीवसृष्टीमध्ये आईची भूमिका अग्रगण्य असल्याचे आपल्याला दिसून येते. कारण मुलांच्या आयुष्यात नेहमीच ती सुर्याच्या प्रकाशाप्रमाणे वावरत असते जेणेकरून मुलांच्या आयुष्यात कुठेही अंधक्कार पडणार नाही याची काळजी घेत असते.कारण आई आपल्या मुलांसाठी आपल्या जीवाचा आटापिटा करून मुलाला लहाण्याचा मोठा करते.त्यामुळे आज सर्वांचीच प्रथम जबाबदारी आहे की आपल्या आई-वडिलांची सेवा करने,पालनपोषण करणे, त्यांच्या प्रकृतीची काळजी घेणे व त्यांच्या वेदना जाणुन घेऊन त्यांवर उपाययोजना करणे आणि आई-वडीलांना सुखी व समाधानी ठेवणे यातच आपल्याला खरा जागतिक पितृदिन दीसुन येईल.माझ्यामते पितृदिन ठराविक दिवशीच का साजरा करावा.दररोज का साजरा का करू नये? मी तर म्हणेन की मातृत्व-पितृत्व दिवस हा दररोज आई-वडीलांची सेवा करून साजरा केला पाहिजे व आपण ते दिवस आठवायला पाहिजे की आपल्याला लहाण्याचे मोठे करण्यासाठी आईने कीती यातना व दु:ख सहन केले असावे.याची जाणीव आज मुलांनी ठेवण्याची गरज आहे.कारण आईने आपल्याला वटवृक्षाच्या छायेत लहाण्याचे मोठे केले व याच वटवृक्षाचा पहारेकरी म्हणून वडिलांनी आपली चोख भुमिका बजावली. आई-वडीलच्या तत्परतेमुळेच मुलांच्या केसालाही धक्का लागत नाही ही दैवी शक्तीच म्हणावी लागेल.पितृत्व दिनाच्या निमित्ताने मी सर्वांना हेच सांगु इच्छितो की आपण सर्वांनी भारतीय संस्कृती जपायला हवी यातुनच आपल्याला खऱ्या अर्थाने आई-वडीलांची सेवा करता येईल.पाश्चिमात्य देशात आई-वडील सोडून इतर नातेसंबंध अंकल व टी या दोन शब्दात संपुष्टात आली आहे.परंतु भारतीय संस्कृतीत आजी- आजोबा,काका-काकु,मामा-मामी, आत्या-मामा,ताई-दादा इत्यादी अनेक वेगवेगळे शब्द आपल्याला वेगवेगळ्या नात्यांप्रमाणे दिसून येतात त्यांचा सन्मान व्हायलाच पाहिजे. त्यामुळे अंकल-न्टी हे पाश्चिमात्य शब्द विसरायला हवे. त्याचबरोबर मम्मी-पप्पा या शब्दांना पुर्णविराम देऊन आई-बाबा असे शब्द ऐकू आले तर भारतीय संस्कृतीचा सन्मान अवश्य होईल असे मला वाटते.आपण १५ जूनला पितृदिन (फादर्स डे) साजरा करीत असतांना पृथ्वी मातेचाही थोडासा विचार करायला हवा.कारण आज पृथ्वीची जोपासना होत नसल्याने निसर्ग दिवसेंदिवस कोपत आहे.याकरीता जागतिक पितृत्व दिनाचे औचित्य साधून प्रत्येक मुलांनी आई-वडीलांच्या आठवणीत रहावे यासाठी आजच्या दिवशी एकतरी वृक्ष लावले पाहिजे.यामुळे एकाच दिवशी देशासह संपूर्ण जगात करोडोंच्या संख्येने वृक्ष लागवड झाल्याचे आपल्याला दिसून येईल.यामुळे पृथ्वीचे संतुलन स्थिर रहाण्यास मोठी मदत होईल व आई-वडीलांना निसर्गाचा आनंद घेता येईल.कारण आज बदलत्या हवामानामुळे निसर्ग दिवसेंदिवस ढासळत आहे.त्यामुळे आई-वडीलांपेक्षा मोठी आणि महान म्हणजे धर्तीमाता (पृथ्वी) ज्यामुळे आज आपण या पृथ्वीतलावर सुखरूप आहोत.परंतु वाढत्या शहरीकरणामुळे व औद्योगिकीकरणामुळे जंगलतोड मोठ्या प्रमाणात होत असल्याने पृथ्वीमाता आज धोक्याच्या उंबरठ्यावर येऊन ठेपली आहे.त्यामुळे तीला वाचविण्याची जबाबदारी आज आपल्या सर्वांवर आली आहे. करिता पृथ्वीला आई-वडीलांचा दर्जा देवून मोठ्या प्रमाणात सर्वच स्तरातून वृक्षलागवड व्हायला हवी.यामुळे मानव,पशुपक्षी व संपूर्ण जीवजंतूच्या रक्षणासाठी मोठी मदत होईल व निसर्ग प्रफुल्लित ठेवण्यासाठी आणि ऑक्सिजनची मात्रा वाढविण्याच्या दृष्टीने हा आगळावेगळा उपक्रम ऐतिहासिक ठरेल.

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

## रंगढंग माणसांचे

रंगढंग माणसांचे प्रत्येकाचे वेगवेगळे
कोणी स्वभावाने तापट तर कोणी भोळे...
कोणी स्वभावाने मोकळे तर कोणी कपटी
कोणी दिलदार मनाचे तर कोणी हट्टी...
कोणी बोलायला गोड तर कोणी फारच कडवे..
कोणी वरून चांगले तर कोणी मधून भडवे...
काहीजण दाखवतात वरून चांगुलपणाचा आव
पण पोटात असतो त्यांच्या वेगळाच कुटील डाव...
काहीजण दिवसा चालतात नाकासमोर बघून...
संध्याकाळी येतात वाईट कुकर्म करून...
कोणी चांगुलपणाचा आव आणत असतो...
कोणाच्या डोक्यात वाईट करण्याचा प्लॅन असतो...
कोणी आपल्या वर्तनातून नम्रता दाखवतो...
कोणी आपल्या आचरणातून रुबाब दाखवतो...
कोणी रागीट असून गरीब असल्याचे ढोंग करतो...
कोणी शांत राहून काटा काढण्यात माहीर असतो..
कोणी दिवसा लोकांना सत्कर्म करून दाखवतात...
संध्याकाळी मात्र खुशाल कुकर्म करतात...
सगळीकडेच हा खेळ सर्रासपणे चालू आहे...
अशा नराधमांना शिक्षा देणे काळाची गरज आहे...
काहीजण सढळ हाताने दानधर्म करतात..
कोणी कपटनीतीने एखाद्याला फसवतात...
कोणी गर्भश्रीमंत असल्याचा माज दाखवतात...
कोणी श्रीमंत असून गरीब असल्याचे ढोंग करतात...
पृथ्वीतलावर विविध रंगढंगाची माणसे आढळतात...
कोणी दिसायला फार चतुर व चाणाक्ष असतात...
कोणी मुंगी बनून साखर खाणारे असतात...
कोणी धाक दाखवून इतरांना लुबाडणारे असतात...

**- बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

## राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टीच्या प्रदेश सचिवपदी सचिन आडे

**जालना । प्रतिनिधी -** राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टीच्या महाराष्ट्र राज्य प्रदेश सचिव पदी जालना येथील सचिन आडे पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मुंबई येथे प्रदेश कार्यालयात राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष उपमुख्यमंत्री अजितदादा पवार व महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष खा. सुनील तटकरे ,पार्थ अजित पवार यांच्या सूचनेनुसार युवक प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण यांनी सचिन आडे पाटील यांना नियुक्तीपत्र देवून नियुक्ती केली आहे. यावेळी राज्यमंत्री इंद्रनील नाईक, प्रदेश सरचिटणीस आ. शिवाजीराव गर्जे, आ. राजेश विटेकर, आ. सुनील टिंगरे, राष्ट्रवादी युवक कॉँग्रेस पार्टीचे प्रदेशाध्यक्ष सुरज चव्हाण, राष्ट्रीय सचिव परबजितसिंग सैनी, प्रदेश सरचिटणीस अमर पाटील, प्रदेश सरचिटणीस रणजित नारुटे, अल्पसंख्यांक प्रदेश सरचिटणीस कय्युम खान,रशीद बागवान, गणेश भुतेकर, राहुल लशकर, लखन, आकाश शिंदे आदिंची उपस्थिती होती. प्रदेश सचिवपदी सचिन आडे पाटील यांची नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

पान १ वरुन

### विद्यार्थ्यांचे परदेशी ...

आणि पदव्युत्तर अभ्यासक्रम उपलब्ध होतील. उदयोन्मुख क्षेत्रातील कार्यक्रम - एआय, सायबर सुरक्षा, सर्जनशील उद्योग - जागतिक उद्योगांच्या इनपुटसह डिझाइन केले जातील.भारतीय विद्यार्थ्यांसाठी नोकरीचा संधी उपलब्ध होतील.

इलिनॉय इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (इलिनॉय टेक) हे स्वतंत्ररित्या पदवी देणारे आणि भारतात कॅम्पस स्थापन करणारे पहिले अमेरिकन विद्यापीठ आहे.संगणक विज्ञान, अभियांत्रिकी आणि व्यवसाय यासारख्या उच्च मागणी असलेल्या क्षेत्रांमध्ये पदवीपूर्व आणि पदवीधर शिक्षण उपलब्ध होतील. त्यांचा प्रसिद्ध एलिव्हेट प्रोग्राम देखील ते राबवणार आहेत. जो सर्व विद्यार्थ्यांना इंटर्नशिप, संशोधन, स्पर्धा उपलब्ध करून देईल.

युरोपमधील प्रीमियम डिझाइन शाळांपैकी एक, इस्टिटुटो युरोपियो डी डिझाइन (खएऊ) फॅशन, उत्पादन डिझाइन आणि व्हिज्युअल कम्युनिकेशनमध्ये जागतिक दर्जाचे कौशल्य उपलब्ध करून देईल.

### प्राप्त निधी ...

नियोजन करुन कामाच्या याद्या तयार करुन त्यास वेळेत तांत्रिक व प्रशासकीय मंजूरी घेवून सर्व निधी वेळेत खर्च करण्याचे नियोजन करावे. सदर निधीतून कामे करतांना लोकप्रतिनिधींना विचारात घेवूनच निधी खर्च करावा. ज्या यंत्रणानी प्रास्तावित केलेला निधी वेळेत करणार नाहीत, त्याची सर्वस्वी जबाबदारी त्या संबंधीत यंत्रणा प्रमुखाची राहील याची दक्षता घ्यावी असेही त्यांनी सूचित केले. तसेच जिल्हा वार्षिक योजना सन २०२४-२०२५ अंतर्गत सर्वसाधारण योजना ३७७.६३ कोटी, अनुसुचित जाती उपयोजना ७५.६२ कोटी, आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजना ३.१३ कोटी असे एकूण ४५६.३८ कोटींचा निधी खर्च झाल्याचे त्यांनी सांगितले.

जिल्ह्यात अतिवृष्टी अनुदान वितरणात जो अपहार झाला आहे, तो निधी शासनाचा असून तो निधी सामान्य नागरिकांचा आहे. या प्रकरणांतीला दोषींवर कडक कारवाई झाली पाहिजे असल्याचे सांगत पालकमंत्री श्रीमती मुंडे म्हणाल्या की, पावसाला सुरुवात झाली असुन, शेतकऱ्यांनी खरिप पेरणीच्या कामास सुरुवात केली आहे. याकरीता शेतकऱ्यांचा पिक कर्जासाठी अर्ज प्राप्त होताच बँकांनी संबंधीतास तात्काळ कर्ज उपलब्ध करुन द्यावे. तसेच याबाबत जिल्हाधिकारी यांनी दर आठवड्याला बैठक घेवून पिक कर्ज वितरणांचा बँकांकडून आढावा घ्यावा. तसेच शेती व्यवसाय करतांना होणाऱ्या अनेक प्रकारच्या अपघातांमुळे शेतकऱ्यांचा मृत्यू झाल्यास किंवा त्याला अपंगत्व आल्यास त्यास तात्काळ गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेचा लाभ देण्यात यावा.

जिल्ह्यातील लोकवस्ती आणि वाड्याची महावितरणने सिंगल फेजचे कनेक्शन तोडले असून, हे लोक अंधारात राहत आहे. तरी महावितरणने तात्काळ या लोकवस्ती आणि वाड्याना विज पूरवठा पूर्वरत करुन द्यावा. लोकप्रतिनिधींनी जिल्ह्यातील अनेक शाळेत विद्यार्थ्यांकरीता स्वच्छतागृह नसल्याचे सांगितले आहे. याकरीता लोकप्रतिनीधींच्या निधीतून २० टक्के निधी वापरून शाळेत स्वच्छतागृह करण्यात येईल. जिल्ह्यात वाळू माफिया अवैध वाळूची तस्करी करत असुन, प्रशासकीय अधिकारी-कर्मचाऱ्यांवर हल्ले देखील होत आहे. याकरीता महसूल आणि पोलीस यंत्रणांनी अशा माफियांवर कडक कायदेशिर कारवाई करावी. जिल्ह्यात पोलिस पाटील यांची अनेक पदे रिक्त आहे. याबाबत जिल्हा प्रशासनाने लवकरात लवकर नोटीफिकेशन काढून सदर पदांची लवकर भरती करावी. तसेच सर्व शासकीय कार्यालय स्वच्छ ठेवण्यासाठी राज्य शासनाने नुकताच शंभर दिवसाचा उपक्रम राबविला होता. या उपक्रमापुरते काम न करता जिल्ह्यातील सर्व कार्यालय नेहमी स्वच्छ राहतील यासाठी प्रयत्न करावे. तसेच सर्व कार्यालयावर अपारंपरिक ऊर्जाचा वापर करावा. तसेच जालना शहरात उभारण्यात येणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मारकास आवश्यक तेवढा निधी उपलब्ध करुन देण्यात येणार असल्याचे पालकमंत्री श्रीमती मुंडे यांनी यावेळी सांगितले. प्रारंभी जिल्हा नियोजन अधिकारी सुनिल सुर्यवंशी यांनी जिल्हा नियोजन समिती समोर मागील बैठकीचे इतिवृत्त व अनुपलन अहवाल सादर केला. तसेच जिल्हा वार्षिक योजना सन २०२४-२०२५ अंतर्गत झालेला खर्च व सन २०२५-२०२६ चा प्रारूप आराखड्याची माहिती यावेळी दिली. शासनाने ठरवून दिलेल्या आर्थिक मर्यादेत जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) करीता रु. ३३२.२० कोटीचा प्रारुप आराखडा तयार करण्यात आला होता. राज्यस्तरीय बैठकीत ४६.०० कोटीच्या वाढीसह जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२५-२६ करीता एकूण रक्कम रु. ४३६ कोटीचा निधी अर्थसंकल्पित करण्यात आला आहे.

**लोकप्रतिनिधी मागण्या व मांडलेले मुद्दे पुढीलप्रमाणे.**

**खासदार डॉ. कल्याणराव काळे** : जिल्हा प्रशासनाने अवैध वाळु उत्खनन व वाहतूक रोखण्यासाठी कठोर पावले उचलावीत. वाळुची तस्करी सुरु असल्याने मंजूर घरकुलांना वाळु मिळत नाही. जिल्ह्यात जागोजागी चेकपोस्ट उभारुन उच्च गतीने पळणाऱ्या हायवांवर कारवाई करावी. वन विभागात वन मजूरांना कामे न देता कंत्राटदाराकडून कामे करुन घेतली जात आहेत. त्यांची चौकशी करण्यात यावी. जालना शहरातील मोतीबाग तलावात एमआयडीसीच्या पाण्याचे प्रदुषण होत आहे. त्याला अटकाव करण्यात यावा. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मारकास आवश्यक तेवढा निधी उपलब्ध करुन देण्यात यावा.

**आमदार बबनराव लोणीकर** : ज्या विभागाने जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत प्राप्त निधी वेळेत खर्च केला नाही, त्यांच्यावर कारवाई करण्यात यावी. रस्ते महामार्ग, जिल्हा महामार्गावर विजेचे खांब रोवू नयेत. इन्फ्रा कंपनीमार्फत जिल्ह्यात विजेचे खांब आणि विद्युत रोहित्र उभारण्याचे काम हे निकृष्ट दर्जाचे केली जात आहे. यामुळे अनेक अपघात देखील होत असुन, काही व्यक्ती शॉक लागून दगावली आहेत. इन्फ्रा कंपनीनी केली सर्व कामे निकृष्ट दर्जाची आहेत, त्याची चौकशी व्हावी. शॉक लागून दगावलेल्या व्यक्तीच्या कुंटूंबाना तात्काळ मदत देण्यात यावी. जालना जिल्ह्यात पाच वर्षापासून जमीनीची नोंदणी बंद आहेत, त्या तात्काळ चालु कराव्यात. बँकांनी तात्काळ पीककर्जाची उद्दीष्टपुर्ती वेळेत करावी. जिल्हा उपनिबंधकांनी पीक कर्ज वाटपाकडे व्यप्क्तीशः लक्ष द्यावे. स्वच्छ भारत मिशनच्या माध्यमातून जि.प.शाळेमध्ये स्वच्छतागृह उभारावेत. जिल्हा नियोजन विभागाच्या निधीतून घेतलेल्या पोकलेन मशीन परत आपल्या जिल्ह्यात मागविण्यात याव्यात. अतिवृष्टीचे अनुदानाचा अपहार करणाऱ्यावर कठोर कारवाई करावी.

**आमदार विक्रम काळे** : शेतकऱ्यांना गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेचा लाभ वेळेत देण्यात यावा. जिल्हा वार्षिक योजनेचा निधी वेळेत खर्च करावा. निधी वेळेत खर्च न करणऱ्यावर कारवाई करण्यात यावी. जिल्ह्यातील ज्या गावात स्मशानभूमी नाहीत, अशा गावात जिल्हा वार्षिक योजनेतून स्मशानभूमी उपलब्ध करुन देण्यात यावी.

**आमदार राजेश राठोड**: मंठा तालुक्यातील मागास भागातील दोन प्राथमिक आरोग्य केंद्राच्या प्रशासकीय मान्यता लवकर देण्यात याव्यात. महिला व बाल विकास विभागाने खर्च केलेला निधी व प्रशिक्षणाची माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. मंठा शहरात स्ट्रीट लाईट, सिग्नल व गतिरोधक बसवावेत.

**आमदार नारायण कुचे** : पोलिस पाटील पदांची भरती लवकरात लवकर करण्यात यावी. महावितरणने वाड्या वस्त्यांचा वीज पुरवठा तात्काळ सुरु करावा. वन विभागाला दिलेल्या १२ कोटींच्या निधींचा संबंधीताकडून खुलासा घ्यावा. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मारकास आवश्यक तेवढा निधी उपलब्ध करुन देण्यात यावा.

**आमदार संतोष दानवे** : महावितरणने अनेक वाड्या वस्त्यांचा सिंगल फेज वीज पुरवठा तोडला आहे. सदर वीज पुरवठा तात्काळ सुरु करण्यात यावा. तसेच नाविण्यापूर्ण योजने अंतर्गत होणारी कामे करतांना लोकप्रतिनिधींना विचारात घ्यावे. तसेच या योजनेचा निधी सर्व तालूक्यात समान खर्च करण्यात यावा. यावेळी बैठकीस जिल्हा नियोजन समितीचे सदस्य आणि विविध विभागाचे विभाग प्रमुख यांची उपस्थिती होती.

# मंदिराच्या कळसावर पडली वीज, भिंतीला बसले तडे



**मंठा । प्रतिनिधी -** मंठा तालुक्यातील मागील दोन दिवसापासून विजेचा तांडव तर मेघगर्जनेसह पाऊसही पडत आहे. विजेच्या या नैसर्गिक आपत्तीमध्ये अनेक व्यक्ती, प्राणी, मोठमोठाली वृक्ष या कचाट्यात सापडली असून यातच (दि १४) रोजी अचानक दुपारी विजेच्या कडकडाटासह जोरदार पावसाला सुरुवात झाली. मंठा तालुक्यातील वांजोळा पुनर्वसन या गावातील मारुती मंदिराच्या कळसा खालील भिंतीवर वीज कोसळली भिंतीला तडे गेले असून सुदैवाने जीवित हानी झाली नाही.

# आचार्य अत्रे यांना अभिवादन वरळी चौकात पुण्यतिथी साजरी

**मुंबई । प्रतिनिधी -** येथे मुंबई महापालिकेत मुंबईसह संयुक्त महाराष्ट्राचा ठराव मांडणारे अत्रेच होते. महाराष्ट्र कृती समिती स्थापनेत अत्रेचा पुढाकार होता. महाराष्ट्रासाठीच जगण्या मरण्याची भावना मराठी माणसांच्यात चेतवत ठेवण्याचे काम अत्रे व त्यांच्या लेखणीने समर्थपणे केले. अत्रे यांच्या वाणी व लेखणीने लढ्यात दिलेले योगदान फार प्रभावी व अमूल्य आहे. अत्रे यांचे विविध पैलू असलेले व्यक्तिमत्त्व प्रसिद्ध आहेच.मुंबईसह अपेक्षित महाराष्ट्र' राज्य नावास आकाराला येण्यात अत्रेचा वाटा मोठा आहे. विविध मार्गानी अत्रे यांनी संयुक् महाराष्ट्र निर्मितीची गाथा लोकमनात रुजविली त्यामुळे हा लढा यशस्वी झाला. मुंबई मिळवण्यासाठी मराठी माणसांनी जो त्याग केला लढा उभारला ते सध्याची मुंबईची परिस्थिती पाहता भविष्यात मुंबईवर मराठी माणसांचा सर्वाधिकार राहील काय याचे आत्मपरीक्षण आजच्या महाराष्ट्रातील मराठी राज्यकर्त्यांनी करायला पाहिजे. निरक्षर कवयत्री बहिणाबाई यांच्या कविता अत्रे यांनी अधाशासारख्या वाचल्या आणि त्यांना आणि त्यांचे साहित्य महाराष्ट्रापुढे आणले. अत्रेसाहेब हे महाराष्ट्राचे सर्वव्यापी बलदंड व्यक्तिमत्व होते. अशी भावना कुटुंब रंगलय काव्यात चे विसुभाऊ बापट, मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबईचे अध्यक्ष रवींद्र मालुसरे आणि शरद बर्डे यांनी व्यक्त केली.



साहित्य सम्राट आचार्य अत्रे यांच्या ५६ व्या पुण्यस्मरणार्थ मुंबई वरळीनाका येथील आचार्य अत्रे चौकात त्यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यापुढे अत्रेसाहेबांना अभिप्रेत असे अनेक उपक्रम राबविण्यासाठी यापुढे आचार्य अत्रे समिती महाराष्ट्र राज्य या नावाची संस्था स्थापन होत असल्याची घोषणा आरती सदावर्ते-पुरंदरे यांनी केली. कार्यक्रमाला ज्येष्ठ निवेदिका मधू मंजिरी गटणे, श्रीकांत मयेकर, श्रीमती सविता झेंडे या उपस्थित होत्या.

# कृषी क्रांती बहुउद्देशीय सेवाभावी संस्थे अंतर्गत वृक्षारोपण उपक्रमाची सुरुवात

**जालना । प्रतिनिधी -** सनातनी संस्कृतीतील एक अत्यंत अद्भुत आणि प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व असलेले श्री दादागुरू यांचा अखंड निराहार महाव्रत तपस्या १३ जून २०२५ रोजी १७०० दिवस पूर्ण करून एका ऐतिहासिक टप्प्यावर पोहोचला आहे. या महत्त्वाच्या दिवशी जालना जिल्ह्यात दादागुरू यांच्या तपस्येला अभिवादन करण्यासाठी व पर्यावरण संवर्धनासाठी '१७०० वृक्षारोपण' मोहिमेची भव्य सुरुवात करण्यात आली.

दादागुरू हे नर्मदा मिशनचे संस्थापक असून, गेल्या पाच वर्षांपासून (१७०० दिवसांहून अधिक) त्यांनी फक्त नर्मदा जल ग्रहण करत अखंड निराहार महाव्रत साधना करत आहेत. या कठीण आणि अविश्वसनीय तपस्येमुळे दादागुरू यांचे जीवन या सदीतील सर्वात मोठे रहस्य मानले जाते. राज्य सरकारने त्यांच्यावर संशोधन करण्याचा आदेश दिला असून विविध राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संशोधन संस्था देखील त्यांच्या जीवनशैलीचा अभ्यास करण्यास उत्सुक आहेत. अमेरिकेसह इतर अनेक देशांमधूनही त्यांचा अभ्यास करण्यासाठी केंद्र सरकारकडे प्रस्ताव आला आहे.

दादागुरूंचा हा महाव्रत हा केवळ एक तपस्या नाही तर तो एक संकल्प आहे, जो भारताला स्वस्थ, समर्थ व आत्मनिर्भर बनवण्याचा संदेश देतो. त्यांचा हा अनोखा उपक्रम सनातनी संस्कृतीच्या तत्त्वज्ञानाला चालना देत, निसर्गाशी निष्ठा आणि पर्यावरण संवर्धनाचा मूळ संदेश आपल्याला देतो.

या ऐतिहासिक दिवसाला दादागुरूंच्या तपस्येच्या सन्मानार्थ आणि पर्यावरण संवर्धनाच्या उद्देशाने जालना येथील दादागुरू गुरू परिवार व कृषिक्रांती बहुद्देशीय सेवाभावी संस्थेने संयुक्तपणे १७०० वृक्षारोपण मोहिमेची सुरुवात केली. हा उपक्रम जालना साई धाम, सिंदखेडराजा रोड येथील साई धाम परिसरात श्री महंत रामचंद्र गणेश बन गोसावी महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत व आशीर्वादाने पार पडला.

कार्यक्रमामध्ये कृषिक्रांती संस्थेचे अध्यक्ष सतीश मुसळे, उपाध्यक्ष गजानन पालवे, सचिव रितेश देशमुख, शिवकुमार अवचार आणि युवा बहुद्देशीय सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष जयपाल राठोड यांनी विशेष सहभाग घेतला. या वृक्षारोपण मोहिमेत स्थानिक नागरिक ज्यांनी पर्यावरण संवर्धनासाठी एकत्र येण्याचे महत्त्व अधोरेखित केले. वृक्षारोपण उपक्रमाचा उद्देश केवळ परिसराची हरितक्रांती करणे नाही, तर दादागुरू यांच्या तपस्येचा संदेश, निसर्गाशी जपलेली निष्ठा आणि निष्काम सेवा या तत्त्वांची जनजागृती करणे हा आहे. नर्मदा नदीच्या पवित्र जलाप्रमाणेच या वृक्षांनीही जालना परिसरातील पर्यावरण सुधारण्यात मोलाची भूमिका बजावली पाहिजे, अशी अपेक्षा आयोजकांनी व्यक्त केली.




या मोहिमेमुळे जालना जिल्ह्यात पर्यावरण संवर्धनासाठी नवीन जागृती निर्माण होणार असून, लोकांमध्ये निसर्गाशी जुळवून घेत स्वस्थ जीवनशैली अंगीकारण्याची प्रेरणा मिळेल, असे मत सहभागी व्यक्तींनी व्यक्त केले. तसेच या उपक्रमाद्वारे भविष्यातही विविध सामाजिक, पर्यावरणीय आणि सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.

दादागुरूंच्या तपस्येने जगाला शिकवले आहे की, साक्षात् निसर्गाशी जोडून रहाणे व त्याच्या सेवेत लागणे हीच खरी साधना आहे. त्यांच्या या तपस्येच्या १७०० दिवसांच्या व्रतपूर्तीनिमित्ताने सुरू झालेला वृक्षारोपण उपक्रम केवळ जालना जिल्ह्यापुरता मर्यादित न राहता संपूर्ण नर्मदापथावर पर्यावरण रक्षणात मोलाचा ठरावा, अशी आशा आहे.

# आनंदी व निरोगी राहण्यासाठी भारतीय जीवनशैलीचा अंगीकार करावा- डॉ प्रमोद कुमावत

**जाफ्राबाद । प्रतिनिधी -** पाश्चात्य संस्कृती व जीवनशैलीचा अंगीकार केल्यामुळे आपले जीवनमान तणावग्रस्त व रोगी युक्त झाले आहे. सध्या मोठ्या प्रमाणावर पाश्चात्य लोक हे भारतीय जीवनशैलीचा अंगीकार करीत असून आनंदी व निरोगी जीवन जगत आहेत. आपण आपले मूळ भारतीय जीवनशैली, भारतीय आध्यात्म तसेच जीवन जगण्याचे तत्वज्ञान विसरत चाललो आहोत आणि त्यामुळे आपण दुःखी, नैराश्यग्रस्त तसेच अनेक समस्यांनी ग्रासलो आहोत. आनंदी, तणावमुक्त व निरोगी जीवनासाठी भारतीय जीवनशैली व तत्त्वज्ञानाचा अंगीकार केला पाहिजे असे मत डॉ. प्रमोद कुमावत यांनी अंबड येथे सुरू असलेल्या प्रशिक्षणाच्या समारोपप्रसंगी केला.

मत्स्योदरी महाविद्यालय अंबड येथे घनसावंगी व अंबड तालुक्यातील शिक्षकांसाठी निवड व वरिष्ठ वेतन श्रेणीचे प्रशिक्षण गेल्या २ ते १२ जुन २०२५ असे दहा दिवसांपासून सुरू होते. या प्रशिक्षणाच्या समारोपप्रसंगी ताण-तणावाचे व्यवस्थापन या विषयावर बोलताना डॉ. कुमावत यांनी भाष्य केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मत्स्योदरी महाविद्यालयाचे उपप्राचार्य ज्ञानेश्वर उबाळे हे होते.

पुढे बोलताना डॉ.प्रमोद कुमावत म्हणाले, जागतिक आरोग्य संघटनेच्या अहवालानुसार जगामध्ये सात व्यक्तींमागे एक मानसिक रुग्ण आढळला जातो हे प्रमाण कोरोना काळानंतर वाढले आहे. तणावमुक्त जगण्यासाठी अपेक्षित वैद्यकीय सुविधा सध्या पाहिजे त्या प्रमाणात उपलब्ध नसल्यामुळे आपले मानसिक आरोग्य अबाधित राखण्याची जबाबदारी ही आपली स्वतःचीच आहे. दैनंदिन जीवनशैलीमध्ये झालेल्या बदलामुळे तसेच वाढत्या मोबाईलच्या वापर, शहरीकरण, प्रदुषण, आहारातील बदलामुळे मानसिक आरोग्य हे बिघडले आहे. मानसिक आरोग्य उत्तम राखण्यासाठी प्रत्येकाने योग, प्राणायाम, सूर्यनमस्कार, ध्यानधारणा तसेच संवाद साधण्याचे कौशल्य विकसित केले पाहिजे. सामाजिक कार्यातही सक्रिय असले पाहिजे. चांगले छंद चांगली पुस्तकं आणि चांगले मित्र यांच्या संपर्कात राहिले पाहिजे.

या कार्यक्रमांमध्ये प्रशिक्षण सुलभक म्हणून उत्तम काम करणारे चक्रपाणी मुळे, देवा चित्राल, सतिश म्हेत्रे, अशोक पवार, विष्णु राठोड, गौतम चौधरी, प्रल्हाद सोलाटे, राहूल खेमाडे, सौ. कविता गव्हाड, सौ. निता अरसुळे, दत्तात्रय गव्हाणे, संदिप थोरात, दशरथ उंडे, धनंजय तांदळे, सतिश परदेशी, रामेश्वर घोलप या सुलभकांना पेन व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. यावेळी दोन प्रशिक्षणार्थ्यांनी आपली मनोगत व्यक्त केले.

# दुर्दैव कि जीवनमृत्युतील काळाचा अंतरपाट

अहमदाबाद विमान दुर्घटनेनं देशभरात हळहळ व्यक्त केली जात असून मृत्युमुखी पडलेल्या २४१ प्रवाशांसह नागरिकांना श्रद्धांजली अर्पण केली जात आहे. या दुर्घटनेत आप्तेष्ट गमावलेल्या नातेवाईकांचा आक्रोश पाहून देवा! अशी वेळ कुणाच्याही वाटेला येऊ देऊ नको रे बाबा... अशी आर्त हाक अनेकांच्या ह्रदयातून येत आहे. तर, या दुर्घटनेनंतर काही जणांकडून आपणासोबत घडलेल्या विमान प्रसंगातील अशाच आठवणी जागवल्या जात आहेत.

गुजरातच्या अहमदाबाद येथील विमानतळावर विमान अपघाताची अत्यंत दुर्दैवी घटना घडली. या दुर्घटनेमध्ये अपघातग्रस्त विमानातील एक प्रवासी नशिब बलवत्तर म्हणून बचावला, इतर सर्वच्या सर्व प्रवाशांचा जीव गेला. एअर इंडियाच्या बोईंग विमानातील तब्बल २४१ प्रवाशांचा मृत्यू झाल्याने देश शोक सागरात बुडाला असून अनेकांनी यापूर्वीच्या विमान दुर्घटनांच्या आठवणी जागवल्या आहेत. या अपघातामागील अनेक कारणांचा मागोवा घेतल्या जात असला तरी नेमकं कारण येत्या काही दिवसातच स्पष्ट होईल. यातील एक प्रवासी प्रतीक जोशी गेल्या सहा वर्षांपासून लंडनमध्ये राहत होते. एक सॉफ्टवेअर प्रोफेशनल, त्यांनी आपल्या पत्नी आणि भारतात राहणा-या त्यांच्या तीन लहान मुलांसाठी परदेशात उज्ज्वल भविष्य घडवण्याचे स्वप्न पाहिले होते. वर्षानुवर्षे नियोजन, कागदपत्रे आणि संयमाने ते स्वप्न अखेरीस साकार होत होते. फक्त दोन दिवसांपूर्वी, त्यांची पत्नी डॉ.कोमी व्यास एक वैद्यकीय व्यावसायिक यांनी भारतातील नोकरीचा राजीनामा दिला. बॅगा पॅक झाल्या, निरोप घेतले गेले आणि भविष्य वाट पाहत होते.

सकाळी, सर्व पाच जण आशा, उत्साह आणि योजनांनी भरलेले लंडनला जाण्यासाठी एअर इंडिया फ्लाईट १७१ मध्ये चढले. सेल्फी काढला नि नातेवाईकांना पाठवला. नवीन आयुष्य सुरू करण्यासाठी एकतर्फी प्रवास. पण ते स्वप्नांच्या नगरीत पोहोचलेच नाहीत. विमान कोसळले आणि कुणीही वाचले नाही. काही क्षणात, आयुष्यभराची स्वप्ने धुळीला मिळाली. आई, वडील आणि त्यांच्या ३ मुलांची विमानात बसल्याच्या आनंदाच्या भरात घेतलेली शेवटची सेल्फी... हा आनंद त्यांच्या ५ जणांच्या सुखी परिवारावर कधी दुःखाचा डोंगर घेऊन आला त्यांनाही समजले नाही.

विमान धावपट्टीवर सरकत होतं खिडकीबाहेरचं शहर हळूहळू लहान होत चाललं होतं आणि आत बसलेले कुणी पहिल्यांदाच विमान प्रवास करत होतं, कुणी रोजचं पण प्रत्येकाच्या मनात एक समान भावना होती. पोहोचल्यावर फोन करतो वाट पाहू नकोस. कुणी आईला टेक्स्ट केला, कुणी पत्नीला शेवटचा फोटो पाठवला, कुणी ऑफिसच्या ग्रुपवर टेक ऑफ असा मॅसेज टाकला आणि कुणीतरी मनातल्या मनात एक प्रार्थना केली, सगळं नीट होऊ दे रे देवा.

पण त्याच क्षणात काळाने आपली योजना आखली होती. एक मोठा आवाज, आगीचे ज्वाळा आणि एका क्षणात सगळं संपलं. पिशव्या, पासपोर्ट, मोबाईल, घड्याळ असं सारं काही जागेवर होतं. फक्त माणसं नव्हती. उरली फक्त धूर, राख आणि त्यांच्या मागे पडलेली माणसांची वाट पाहणारी नजर फोनवरचे शेवटचे मॅसेज अजूनही वाचले गेले नाहीत. कॉल मी व्हेन यु लँड..., मिस यु... आणि टेक केअर...

यातच कुठे रडणारी आई होती, कुठे गोंधळलेली मुलं, तर कुठे फोन कट झाल्यावर अजूनही हॅलो...हॅलो? म्हणणारं कुणी तरी. कुणीच ठरवत नाही की, शेवटचा टेक्स्ट कोणता असेल, शेवटची मिठी कोणती असेल आणि शेवटचा शब्द कोणता असेल आज जे गेले, त्यांच्या हसण्याच्या प्रतिध्वनी अजूनही कुणाच्या आठवणीत जिवंत आहेत. त्यांनी मागे ठेवलेली स्वप्नं, आवाज, माणुसकी हे सगळं आपल्याला एकच गोष्ट सांगते, आयुष्य क्षणभंगुर आहे त्यामुळे प्रत्येक क्षण प्रेमाने जगा आणि अगदी मनापासून माफ करा. मृत्यू अटळ आहे पण तो येईपर्यंत 'मृत्युशिवाय' जगणं, हेच खरं आयुष्य आहे.

विमान दुर्घटनेत अचानक काळाच्या प्रवाहात हरवलेल्या त्या सर्व निष्पाप आत्म्यांना नम्र श्रध्दांजली!

**सुनील शिरपुरे**
**कमळवेल्ली,यवतमाळ**
**भ्रमणध्वनी-७०५७१८५४७९**

# केवक प्रसिद्धीसाठी समाजकार्य नको!

सध्या प्रत्येक समाजात समाजकार्य करण्याची स्पर्धा लागली आहे. प्रत्येकजण स्वतःला सामाजिक कार्यकर्ता समजत आहे. स्वतःला सामाजिक कार्यकर्ता समजणारी माणसे सध्या समाजात खूप वाढली आहेत. हे सामाजिक कार्यकर्ते समाजकार्य करतात टिचभर आणि लोकांना आव आणून सांगतात ढीगभर. म्हणजे समाजकार्य करण्यात माझा फार मोठा सिंहाचा वाटा आहे. समाजकार्य करण्यात मी आघाडीवर आहे. सामाजिक कार्यात माझा हात कोणीही धरू शकत नाही. असे इतरांना मीठ मिरचू लावून सांगण्यात ही माणसे फार पटाईत असतात. आपल्या कमी कार्याचा जास्त गवगवा करतात. म्हणजे स्वतःच स्वतःच्या कार्याची प्रशंसा करून घेतात. मान्य आहे की, आपण समाजकार्य खूप केले आहे. सामाजिक क्षेत्रात तुमचे योगदान खूप मोठे व उल्लेखनीय आहे. तुम्ही समाजाचे जनसेवक आहात.गोरगरिबांच्या, सर्वसामान्य माणसांच्या आणि तळागाळातील लोकांच्या समस्या सोडवण्यात आपण अग्रेसर आहात. म्हणून सामाजिक क्षेत्रात तुमचा हात कोणीच धरू शकत नाही, हे जरी खरे असले तरी आपण एक चूक करतोय, ती चूक म्हणजे आपण केलेले सामाजिक कार्य स्वतःहून लोकांना सांगत बसणे तर आपण केलेले समाजकार्य लोकांना सांगत बसण्याची काहीच गरज नाही.लोकांना आपोआप कळते की, आपण काय समाजकार्य करत आहोत? आणि काय करत नाही? ज्याप्रमाणे फुलांना सांगावे लागत नाही की, मी सुगंधी आहे म्हणून त्यांचा कीर्ती सुगंध आपोआप सर्वदूर पसरतो आणि लोकांना सुगंध देतो. त्याप्रमाणेच आपण केलेले समाजकार्य आपोआप लोकांना कळते आणि समाज आपोआपच तुमचे कौतुक करायला पुढे येतो. बांधवांनो आपण समाजकार्य जरूर करावे, पण आपण केलेले समाजकार्य लोकांना सांगत बसू नये. अशाने आपली सामाजिक प्रतिष्ठा कमी होते. आपल्या माघारी लोक आपली टिंगल टवाळी करतात. आपण आपल्याच हाताने स्वतःच्या पायावर धोंडा मारून घेतल्यासारखे होते. यावरून असा निष्कर्ष निघतो की, आपण जे समाजकार्य करतोय ते केवळ आपल्या स्वार्थासाठीच म्हणजे भविष्यात एखादी निवडणूक लढवण्यासाठी किंवा एखादा सर्वोच्च पुरस्कार मिळवण्यासाठी. कारण आजकाल जिकडे बघावे तिकडे प्रत्येकजण स्वार्थासाठी समाजकार्य करत असल्याचे दिसतोय. कोणतातरी स्वार्थ साधण्यासाठी प्रत्येकाची धडपड समाजकार्य करताना दिसते.अशा सामाजिक कार्यकर्त्यांना पेपरबाजी व बॅनरबाजी करण्याची फार विचित्र सवय असते. कोणतेही सामाजिक कार्य केले की, हे लोक लगेच पेपरबाजी व बॅनरबाजी करतात. काढलेला फोटो सोशल मीडियावर टाकून नुसता कहर करतात.आपल्या कमी कार्याचा सोशल मीडियावर नुसता गवगवा करतात. म्हणजे यांना प्रसिद्धीची खूप मोठी हाव असते. यांना स्वतःचे नाव मोठे व्हावे वाटते. पण अशा लोकांना कोण सांगेल? की, नाव मोठे होण्यासाठी काम देखील तसेच मोठे करावे लागते. तेव्हा लोक आपल्याला आपोआपच मोठे म्हणतात.आपल्या कार्याची वाहवा करतात. स्वतःला पर्यावरण प्रेमी समजणारे काही महाभाग पर्यावरण दिनानिमित्त पर्यावरणाचे महत्त्व सांगत फिरतात.पर्यावरण अबाधित राहावे म्हणून मी खूप वृक्ष लागवड केली आहे आणि तुम्ही देखील करा म्हणून लोकांना आवर्जून सांगतात. वर्तमानपत्रांत किंवा सोशल मीडियावर काढलेला फोटो व्हायरल करतात. आणि नंतर त्या झाडांकडे बघत देखील नाहीत. ती झाडे जिवंत आहेत का? का? मेलीत याचे त्यांना काहीही देणे घेणे नसते. म्हणजे हे लोक केवळ प्रसिद्धीसाठी समाजकार्य करतात हे यावरून स्पष्ट होते. जे खरोखर पर्यावरण प्रेमी असतात, ज्यांना पर्यावरणाची खूप खूप आवड असते, ती माणसे झाडे लावतातही आणि ती झाडे मोठी होईपर्यंत त्या झाडांचे काळजीने संगोपन देखील करतात. त्यांना प्रसिद्धीची हाव नसते ना पेपरबाजीची अशा गोष्टीपासून ते चार हात लांबच राहतात. त्यांचे निसर्गावर खूप प्रेम असते म्हणून ते या पृथ्वीला सृष्टीसौंदर्याने नटवण्याचा प्रयत्न करतात.

अशा पर्यावरण प्रेमींना मनापासून सलाम करावा वाटतो आणि केवळ प्रसिद्धीसाठी समाजकार्य करणाऱ्या लोकांना चांगलाच धडा शिकवावा वाटतो. कारण आजकाल समाजकार्य करणे आणि निवडणूक लढवण्यासाठी प्रसिद्धी करणे हे आजकालच्या लोकांचे धोरण बनले आहे. प्रत्येक क्षेत्रात प्रसिद्धीला हापापलेली माणसे पाहायला आवर्जून मिळतात. ही माणसे आपला स्वार्थ साधण्यासाठी आपल्या कार्याची नुसती प्रसिद्धी करत असतात. या पृथ्वीतलावर अनेक महान व्यक्ती होऊन गेले. त्यात समाजसुधारक व क्रांतिकारक होऊन गेले. जसे की, तथागत गौतम बुद्ध, छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी शाहू महाराज, महात्मा ज्योतिबा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे महान समाज सुधारक आपल्या भारत भूमीत होऊन गेले. यांनी आपले उभे आयुष्य समाजसेवेसाठी अर्पण केले. गोरगरीब, सर्वसामान्य व तळागाळातील लोकांच्या जीवनाला कलाटणी दिली. या महापुरुषांनी समाज सुधारण्याचे जे काम केले आहे, त्या कार्याला जगात तोड नाही. आणि यांच्यामुळेच तर आज आपण सुखाने व सन्मानाने जीवन जगत आहोत. खूप खूप शिक्षण शिकून मोठमोठ्या पदावर विराजमान होत आहोत. एवढे अफाट कार्य या महामानवांनी आपल्यासाठी केले आहे, पण त्यांनी या कार्याची प्रसिद्धी स्वतःहून कधी केल्याचे इतिहासात तर कधी वाचनात आले नाही. या महापुरुषांना जाऊन आज कित्येक वर्ष झाली आहेत तरी सुद्धा हे महापुरुष मेल्यानंतरही कित्येक लोकांच्या हृदयात व मनात कायम जिवंत आहेत. मेल्यानंतरही त्यांची कीर्ती जगभर गाजत आहे. त्यांनी स्वतः स्वतःची प्रसिद्धी न करता, आज जगभर लोकांनी त्यांची प्रसिद्धी केली आहे. आपण तर त्यांच्यापुढे काहीच नाहीत. आपले सामाजिक कार्य त्यांच्यापुढे शून्य आहे तरीसुद्धा आपण प्रसिद्धीला एवढे का हापापले आहोत? कळायला मार्ग नाही. म्हणून बांधवांनो आपण या महापुरुषांचा आदर्श घेऊन खूप खूप सामाजिक कार्य करावे, गोरगरीब, सर्वसामान्य व तळागाळातील लोकांचे जीवनमान उंचावण्यासाठी प्रामाणिकपणे समाजकार्य करावे... एक दिवस आपोआपच आपली सुद्धा प्रसिद्धी होईल... पण केवळ प्रसिद्धीसाठी समाजकार्य नको... हे नेहमी ध्यानात ठेवा...

**- बुध्दभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो.७४९८७१५६६१**



**वाहनांचा लोकार्पण सोहळा पालकमंत्री पंकजा मुंडे यांच्या हस्ते पडला यावेळी खासदार कल्याण काळे, आ. बबनराव लोणीकर, आ. नारायण कुचे, आ. संतोष दानवे आदी**

# पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते पोलिस विभागाच्या १२ वाहनांचे लोकार्पण

**जालना । प्रतिनिधी -** जिल्हा पोलिस दलास जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून १ कोटी ८२ लक्ष रुपयांचा निधी वितरीत करण्यात आला होता. या निधीतून पोलिस विभागाने एकुण १२ वाहने घेतली यात महिंद्रा स्कॉर्पिओ, बंदोबस्तासाठी मोटारगाड्या आणि पाण्याचे टँकर यांचा समावेश आहे. पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते शनिवार दि.१४ जुन २०२५ रोजी दुपारी १.३० वाजता पोलिस कवायत मैदानावर नवीन वाहनांचे लोकार्पण करण्यात आले.

यावेळी खासदार डॉ. कल्याण काळे, आमदार बबनराव लोणीकर, आमदार संतोष दानवे, आमदार नारायण कुचे, आमदार विक्रम काळे, माजी आमदार अरविंद चव्हाण, जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, पोलिस अधिक्षक अजयकुमार बन्सल, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी शिरिष बनसोडे, यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी पोलिस विभागाच्या वाहनांना पालकमंत्री पंकजा मुंडे यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून लोकार्पण करण्यात आले. तसेच पोलिस विभागाच्या वाहनांनी यावेळी पथसंचलन देखील केले.

# नीट परीक्षेत चिराग लड्ढाचे यश; देशात ३५६६ वा क्रमांक

**जालना । प्रतिनिधी -** शहरातील चिराग सुशांत लड्ढा याने नुकत्याच जाहीर झालेल्या वैद्यकीय प्रवेशासाठीच्या नीट परीक्षेत संपूर्ण भारतातून ३५६६ वा क्रमांक पटकावून उल्लेखनीय यश मिळवले आहे. या घवघवीत यशामुळे लड्ढा कुटुंबीयांचे व जालना शहराचे नाव उज्ज्वल झाले आहे. या यशाबद्दल आजोबा प्रकाशचंद्र लड्ढा, आई रीता लड्ढा, आजी शंकुतला लड्ढा व परिवाराने या यशाबद्दल चिरागचे अभिनंदन केले असून, त्याच्या पुढील वैद्यकीय शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. चिरागने ही परीक्षा आत्मविश्वास, सातत्यपूर्ण अभ्यास, पालक व गुरूजनांच्या मार्गदर्शनाच्या जोरावर उत्तम प्रकारे उत्तीर्ण केली आहे. नीट ही परीक्षा वैद्यकीय शिक्षणाच्या प्रवेशासाठी अत्यंत स्पर्धात्मक मानली जाते.



# पत्रकार दत्ता खंदारे यांची समस्त कक्कय्या महासंघाच्या प्रसिद्धी प्रमुखपदी नियुक्ती!

**मुबंई -** समस्त कक्कय्या समाज महासंघ यांच्या २०२५ या रौप्य महोत्सवी वर्षाचे मंगलमय औचित्य साधून कार्यकर्ता मार्गदर्शन शिबीर आणि सामाजिक मंडळाच्या चर्चा सत्राचे आयोजन करण्यात आले होते. राजर्षि शाहू महाराज सभागृह,दादर येथे घेण्यात आलेल्या शिबिरात पत्रकार दत्ता खंदारे यांची महासंघाच्या केंद्रिय कार्यकारणीने प्रसिद्धी प्रमुख म्हणून नेमणूक केली.

समस्त कक्कय्या महासंघाचे अध्यक्ष श्री निवृत्ती सावळकर, कार्याध्यक्ष मारुती सदाफुले यांच्या हस्ते नियुक्तीचे पत्र दिले असून यावेळी समाज बांधव मोठया संख्येने उपस्थित होते.

### तहसीलदार कल्याण काळदाते यांची कारवाई

# अवैद्य वाळू वाहतूक करणारे तीन टिप्पर महसूल विभागाच्या जाळ्यात



**मंठा । प्रतिनिधी -** तालुक्यातील पूर्णा नदी पात्रातून वाळू उपसा करून अवैद्य मार्गाने विक्री करण्यासाठी घेऊन जाणारे हायवा टिप्पर प्रभारी तहसीलदार कल्याण काळदाते यांनी पूर्णा नदीपात्रामधून वाहतूक करणारी टिप्पर पकडून दबंग कारवाई केली असून या कारवाईने अवैद्य वाळू उपसा करणाऱ्यांचे चांगलेच धाबे दणाणले असून अवैद्य रेती धंद्याला अल्प प्रमाणात का होईना लगाम बसला असे सामान्यातून बोलले जात आहे. दि १३ आणि १४ जून रोजी ही कारवाई केली असून यामध्ये नायब तहसीलदार विकास राजपूत, मंडळ अधिकारी संजय उफाड, तलाठी जंगले, शेट्टी, कोतवाल बालासाहेब गिरी, अरुण राठोड, योगेश पवार, जितेंद्र लहाने यांची या दबंग कारवाई मध्ये उपस्थिती होती.






हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.